# स्नेह समृध्दी मंडळ, देवरुख

## “संवाद विद्यार्थ्यांबरोबर” कार्यक्रम

दिनांक १४ जुलै २०२४ रोजी स्नेह समृध्दी मंडळ या सामाजिक संस्थेने देवरुख येथे तालुक्यातील निवडक विद्यार्थी व पालकांना एकत्र निमंत्रित केलं होतं. शिक्षण विभाग पंचायत समिती देवरुख, पित्रे फाऊंडेशन मुंबई, स्नेह समृध्दी संस्थेचे संस्थापक, संस्थेचे ट्रस्टी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. पाऊस, एस.टी.ची विस्कळीत सेवा असे असुनही १५५ व्यक्ती या कार्यक्रमाला उपस्थित होते.

श्री.लक्ष्मी नृसिंह मंगल कार्यालयात सकाळी १० ते १ या कालावधीत “संवाद विद्यार्थ्यांबरोबर” हा कार्यक्रम संपन्न झाला. विद्यार्थ्यांनी अतिशय उत्तम सहभाग घेतला. स्नेह समृध्दी या संस्थेने केलेल्या आर्थिक मदतीचा व मार्गदर्शनाचा आपल्याला कसा उपयोग झाला याबाबत मांडणी मुलांनी केली. पालकांनी देखील आपल्या भावना व्यक्त केल्या. मा.श्री.अजय पित्रे सर यांनी आपल्या पित्रे फाऊंडेशन मार्फत करीत असलेल्या विमलताई पित्रे योजनेच्या माध्यमातुन आर्थिक मदतीचे जे योगदान केले त्याचा योग्य लाभार्थींना लाभ मिळत असल्याचे समाधान व्यक्त केले. एकूणच संस्था योग्य व्यक्तींपर्यंत पोहोचत आहे याबद्दल संस्थेच्या सर्व टिमचे अभिनंदन केले.

संस्थेच्या वतीने या कार्यक्रमाचा हेतू मांडण्यात आला. संवाद हा सर्वांनी मुलांशी कसा व का साधावा म्हणजे संस्था व विद्यार्थी, पालक व विद्यार्थी, शिक्षण विभाग व विद्यार्थी आणि अर्थ सहाय्य करणारे दाते मंडळी व विद्यार्थी. यांचा परस्पर संवाद कसा असावा याबाबत मांडणी झाली.

उद्याची ही जबाबदार पिढी कशी उत्तम तयार करता येईल त्यादृष्टीने संस्थेच्या वतीने मांडणी झाली. आर्थिक मदतीचा हात देण्यात येईल, त्याचबरोबर मुलांना संस्थेचा नियमित संपर्क राहिल. पालकांनीही याबाबत दक्ष असावे, आपला पाल्य काय करतो, त्याची प्रगती व त्याचे वर्तन याबाबत काळजी घेणे अगत्याचे आहे.

संस्था यासाठी नेहमीच सज्ज असेल. मुलींचे समुह करुन सातत्याने संवाद ठेवण्यात येईल. याकरीता अर्थसहाय्य करणारी माणसं, संस्था, शासकीय यंत्रणा व ग्रामस्थ संस्थेच्या पाठीशी असावेत अशा भावना संस्थेच्या वतीने संस्थेच्या अध्यक्षा मा.श्रध्दा देशपांडे यांनी व्यक्त केल्या. संस्थेचे व्यवस्थापक श्री.अनिल कुडाळकर यांनी या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. संस्थेच्या वतीने सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.